मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी 14 नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

## प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी गुरुवारी प्रसिद्ध करण्यात येणार होती,मात्र राज्य निवडणूक आयोगाकडून अचानक बदल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी गुरुवारी (दि.६) प्रसिद्ध करण्यात येणार होती. मात्र तो कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि.४) अचानक बदलला आहे. आता, प्रारूप मतदार यादी १४ नोव्हेंबला प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे इच्छुकांसह माजी नगरसेवकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.



मतदार यादी सुधारणा करा, दुबार व मृत मतदारांची नावे वगळा. त्यानंतरच महापालिका निवडणुका घ्या, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात येत आहे. त्यासाठी राज्यभरात आंदोलने केली जात आहे. त्या मागणीची दखल घेऊन राज्य निवडणूक आयोगाने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे वेळापत्रक नऊ दिवसांनी पुढे ढकलले आहे.

आता प्रभागनिहाय मतदार यादी ६ ऐवजी १४ नोव्हेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर सूचना व हरकती २२ नोव्हेंबरपर्यंत म्हणजे ९ दिवस स्वीकारल्या जाणाऱ्या आहेत. प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन अंतिम मतदार यादी ६ डिसेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदान केंद्रांच्या ठिकाणाची यादी ८ डिसेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी १२ डिसेंबरला प्रसिद्ध करण्याचा सूचना निवडणूक आयोगाने महापालिका आयुक्तांना दिल्या आहेत.

# आमदार शंकर जगताप यांच्याकडे पक्ष नेतृत्वाकडून मोठी जबाबदारी!

## 128 नगरसदस्य; आमदार जगताप यांच्याकडे पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

नोव्हेंबर (प्रतिनिधी): आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने जाहीर होत आहेत नुकत्याच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुका जाहीर झाल्या. पुढील टप्प्यात जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका जाहीर होणार आहेत. भारतीय जनता पक्षाने या निवडणुका केंद्रस्थानी ठेवत मोठी घोषणा केली. जिल्हा निवडणुक प्रमुख व जिल्हा निवडणुक प्रभारी यांच्या नियुक्तीची घोषणा करताना पिंपरी चिंचवड शहरातील आगामी निवडणुकांची मोठी जबाबदारी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत. शहराचे निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-2025 करिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा निवडणुक प्रमुख व जिल्हा निवडणुक प्रभारी यांच्या नियुक्तिची घोषणा केली आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप यांच्याकडे मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



> आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-2025 करिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्त्वाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाने जिल्हा निवडणूक प्रमुख व प्रभारी यांची घोषणा केली आहे.या पार्श्वभूमीवर मला पिंपरी-चिंचवड शहर कार्यक्षेत्रात "निवडणूक प्रमुखपदी" नियुक्ती करून मोठी जबाबदारी दिली आहे. माझ्यासाठी ही सन्मानाची व अभिमानाची बाब आहे. पक्ष नेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखविल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. हा विश्वास सार्थ ठरेल याची मी ग्वाही देतो. या निवडणुकांसाठी मायक्रो प्लॅनिंग, कार्यकर्त्यांचे संघटन, पदाधिकाऱ्यांचा संवाद आणि सहकार्याने भारतीय जनता पक्षाचे कार्य व जनकल्याणकारी योजना प्रत्येक तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी अखंडपणे कार्यरत राहीन.
>
> - शंकर जगताप , आमदार, चिंचवड विधानसभा

### जगताप यांच्याबद्दल विश्वासाची मोहर

» पिंपरी चिंचवड शहराचे नाव विकसित शहरांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. या शहराच्या गरजा, पुढील पन्नास वर्षाचे नियोजन, भाजपाच्या संकल्पनेतील विकसित शहर या दृष्टिकोनातून भाजपला या शहरांमध्ये पुन्हा एकदा कमळ फुलवायचे आहे. त्या दृष्टीने उच्च विद्या विभूषित असलेल्या उमद्या नेतृत्वाकडे प्रदेश नेतृत्वाने मोठी जबाबदारी दिली आहे. या दृष्टीने चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पडतील असा विश्वास भाजपच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी चिंचवड हा कधीकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र भाजपच्या माध्यमातून लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांनी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवडचा गड भाजपाचा बालेकिल्ला म्हणून प्रस्थापित केला. 2017 मध्ये लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजप पिंपरी चिंचवडमध्ये मोठा पक्ष म्हणून पुढे आला. थम्पिंग मेजॉरिटीने भाजपने तब्बल 77 नगरसेवक पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभागृहात नेले. भाजपाला पहिला महापौर या शहराला लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली मिळाला.

दरम्यान शहराध्यक्ष म्हणून काम केलेल्या आणि संघटन कौशल्य, व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांची मोट बांधण्याचे कसब असलेल्या चिंचवड विधानसभेचे विद्यमान आमदार शंकर जगताप यांच्यावर भाजपने विश्वास दाखवत मोठी जबाबदारी दिली आहे. निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप आगामी निवडणुकांमध्ये पिंपरी चिंचवड शहराची कमान सांभाळणार आहेत. शहरामध्ये महापालिका निवडणुकीसाठी 128 उमेदवार रिंगणात असणार आहेत.

# प्लास्टिक बंदीबाबत महापालिका सज्ज

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार दंडात्मक व कायदेशीर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन आता युद्धपातळीवर सक्रिय झाले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ग्राहक व विक्रेत्यांविरुद्ध बंदी असलेल्या प्लास्टिकच्या वापरावर कारवाई सुरू करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अशा प्रकारचा वापर आढळल्यास दंडात्मक कारवाईसोबतच कायदेशीर कारवाईदेखील करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातून देण्यात आली.

राज्य शासनाने १५ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, प्लास्टिक लेप असलेल्या किंवा प्लास्टिक थर असलेल्या वस्तूंवर संपूर्ण बंदी लागू करण्यात आली आहे. या अधिसूचनेअंतर्गत पेपर किंवा ॲल्युमिनियमवर प्लास्टिकचा थर असलेले डिश, कप, प्लेट, वाडगे, कंटेनर, चमचे, ग्लास इत्यादी एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तू पूर्णपणे बंदीच्या यादीत समाविष्ट आहेत.

या निर्णयाचा उद्देश दैनंदिन कचऱ्यातील प्लास्टिकचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करणे हा आहे. कारण प्लास्टिकचे विघटन अत्यंत कठीण असून त्यातून गंभीर पर्यावरणीय प्रदूषण निर्माण होते. अनेक वेळा हा प्लास्टिक कचरा जलाशयांमध्ये फेकला जातो किंवा जाळला जातो, ज्यामुळे हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण देखील वाढते.



### प्रभागनिहाय पथकांची नियुक्ती..

» पिंपरी चिंचवड महापालिकेने प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. या पथकांना दंड आकारणी व जप्तीची कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत. दुकाने, बाजारपेठा तसेच मोठ्या किरकोळ केंद्रांवर नियमित तपासणी मोहीम राबवली जात आहे. तरी नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांच्या ऐवजी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा अवलंब करावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत आहे.

### अशी आहे दंडाची तरतूद

» पहिल्यांदा उल्लंघन आढळल्यास – ५,००० रुपये दंड
» दुसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास – १०,००० रुपये दंड
» तिसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास – २५,००० रुपये दंड आणि पुढील कायदेशीर कारवाई

“ पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात आलेली प्लास्टिक बंदी मोहीम ही केवळ एक मोहिम नसून ती पर्यावरणाच्या संरक्षणाशी निगडित आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून कापडी पिशव्यांचा वापर वाढवावा. स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवड शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा.

- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

“ प्लास्टिकचा वापर थांबवण्यासाठी महापालिका जनजागृतीबरोबरच तपासणी मोहिमाही राबवत आहे. बंदी असलेले प्लास्टिक वापरणाऱ्यांवर कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करून स्वच्छ, हरित आणि सुंदर शहर निर्मितीस हातभार लावावा.

- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पूर्णानगरमध्ये जागोजागी साचलेला कचरा अन् फूटपाथाची दुर्दशा; नागरिक त्रस्त

## तुटलेले, खचलेले फूटपाथ, ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग, रस्त्यावर आलेले चेंबर या समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

परिसरात तुटलेले, खचलेले फूटपाथ, ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग, रस्त्यावर आलेलेचेंबरयासमस्यांनी पूर्णानगरमधील नागरिक त्रस्त झाले आहेत. सातत्याने फुटपाथ अथवा रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचले जातात, तत्काळ उचलले जात नाहीत. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीसह आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो आहे. भटक्या कुत्र्यांची संख्याही त्यामुळेच वाढते आहे.

शिर्के बिल्डींग परिसर नऊ ते पाच, अनुज्ञा हाईट, आरटीओच्या पाठीमागील बाजू, सहयोग चौक फूटपाथ दुर्दशा, ड्रेनेजचे चेंबर वर आलेले आहे. स्वामी विहार, राजयोग हौसिंग सोसायटी, नवकार हाईट्स, कामधेनू सोसायटी, हंसराज कंप्युटर, रॉयल बिर्याणी या परिसरातील रस्ता, फुटपाथ झाडला जात नाही, कचऱ्याचे ढीग साचलेले आहे.



“ प्रशासकीय राजवटीत अधिकारी सुस्तावले आहेत. त्यांच्यावर नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्याने अधिकाऱ्यांवर कोणाचाही वचक राहीलेला नाही. वारंवार तक्रारी अथवा समस्या सांगितल्यानंतरही काम होत नाही. या सर्वांचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होतो. पूर्णानगरमधील कचरा, फूटपाथ दुर्दशा, चेंबरची इतर समस्या तत्काळ लवकरात-लवकर मार्गी लावाव्यात.

- निलेश नेवाळे (ग्रामस्थ)

“ पूर्णानगर परिसरातील समस्यांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क केल्यास मनुष्यबळ कमी असल्याचे सांगितले जाते. परिसरात फूटपाथची दुर्दशा, कचऱ्याचे साचलेले ढीग, चेंबर अशा समस्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कचरा, तुटलेले फूटपाथ, चेंबरच्या समस्या तत्काळ मार्गी लावाव्यात.

- विनोद रोकडे ग्रामस्थ

“ पूर्णानगरचा फूटपाथचे काम जास्त आहे. नवीन कामात या फुटपाथांची दुरुस्ती करण्णार आहोत. पाचशे ते सहाशे मीटर लांबीचे फुटपाथ दुरुस्ती आहे. नवीन बजेटमध्ये हे काम घेणार आहोत. त्यानंतर केले जाईल. चेंबरचे काम सोमवारी करणार आहोत.

- बालाजी पांचाळ, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग

“ झाडांच्या फाद्यां उद्यान विभाग छाटतात त्याची विल्हेवाट त्यांनीच लावली पाहिजे. ते लावत नाही, कचरा वाळला जातो, शेवटी आम्हालाच कचरा उचलावा लागतो. आमचा किरकोळ कचरा उचलण्यासाठी माणूस पाठवला आहे.

- महेश आढाव आरोग्य विभाग

# पुणे महापालिकेकडून पेट स्कॅन, रेडिओ डायग्नोस्टिक प्रकल्प राबविण्याची तयारी

## शहरातील कर्करोगग्रस्त गरीब रुग्णांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे



### डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता

» आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, हा प्रकल्प डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. पुण्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा दरात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाकडून घेतला जाणार आहे. या उपक्रमामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे निदान वेळेत होऊन रुग्णांना योग्य उपचार मिळू शकणार आहेत.

### गरजू रुग्णांना होणार फायदा

» या सुविधेचा सर्वात मोठा फायदा गरीब व गरजू रुग्णांना होणार असून, त्यांना केंद्र सरकारची आरोग्य योजनेच्या (सीजीएचएस) दरात ही सेवा मिळेल. त्यामुळे कर्करोग निदानासाठी होणारा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला असून, कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### पेट स्कॅन व रेडिओ डायग्नोस्टिक प्रयोगशाळा

» पुणे महापालिका ही देशातील पहिली अशी महापालिका ठरणार आहे, जी स्वतःच्या आरोग्य यंत्रणेतून पेट स्कॅन व रेडिओ डायग्नोस्टिक प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देणार आहे. या प्रकल्पामध्ये पॅथॉलॉजी, बायोकेमिस्ट्री लॅब, एमआरआय, सीटी स्कॅन यांसह अत्याधुनिक निदान तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील कर्करोगग्रस्त गरीब रुग्णांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. पुण्यातील कोणत्याही महापालिकेच्या किंवा सरकारी रुग्णालयात सध्या पेट स्कॅनची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागते. मात्र, त्या रुग्णालयांचे दर परवडणारे नसल्याने अनेक रुग्णांना योग्य उपचार मिळणे कठीण जाते. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका आता सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर पेट स्कॅन व रेडिओ डायग्रोस्टिक प्रकल्प कार्यान्वित करण्याची तयारी सुरु केली आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात आज (दि.४) पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी पाहणी केली. यावेळी आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. निना बोराडे, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे आदी उपस्थित होते. स्वारगेट येथील हिराबाग आरोग्य कोठी शेजारी सुरू असलेल्या वसंतदादा पाटील प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीत हा प्रकल्प उभारला जाणार आहे.

शहरात वाढत्या कर्करोगाच्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर या सुविधेची आवश्यकता तीव्रपणे जाणवत होती. पुणे महापालिका ही देशातील पहिली अशी महापालिका ठरणार आहे, जी स्वतःच्या आरोग्य यंत्रणेतून पेट स्कॅन व रेडिओ डायग्रोस्टिक प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देणार आहे. या प्रकल्पामध्ये पॅथॉलॉजी, बायोकेमिस्ट्री लॅब, एमआरआय, सीटी स्कॅन यांसह अत्याधुनिक निदान तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे.

या सुविधेचा सर्वात मोठा फायदा गरीब व गरजू रुग्णांना होणार असून, त्यांना केंद्र सरकारची आरोग्य योजनेच्या (सीजीएचएस) दरात ही सेवा मिळेल. त्यामुळे कर्करोग निदानासाठी होणारा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला असून, कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

महापालिका आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, हा प्रकल्प डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. पुण्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा दरात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाकडून घेतला जाणार आहे. या उपक्रमामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे निदान वेळेत होऊन रुग्णांना योग्य उपचार मिळू शकणार आहेत. त्यामुळे पुणे महापालिका आरोग्य विभागाचा हा उपक्रम सर्वसामान्य रुग्णांसाठी आधार ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वीजेच्या समस्येने मोशीकर हैराण

## मागील दोन आठवड्यांपासून वीजेचा लपंडाव सुरु असून वीज समस्येने त्रस्त झाले आहेत.



> मोशीतील वीज ग्राहकांची संख्या जास्त प्रमाणात आहे. यासाठी याभागात स्वतंत्र सबस्टेशन उभारण्याची गरज आहे. येथील अनेक भागात अद्याप भूमिगत वीज वाहिन्या टाकलेल्या नाहीत. प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण केल्यास नागरीकांची वीज समस्येतून सुटका होईल
>
> -संतोष बोराटे, स्थानिक नागरीक

> फिडरची लांबी २५ किलोमीटर आहे. त्यावर लोड आहे. त्यामुळे हे पाच पार्टमध्ये तोडतोय आहे. तीन ते चार किलोमीटरचे फिडर करतो आहे. त्यामुळे लाईट जाण्याची समस्या येणार नाही. एका फिडर वरील लोड पाच फिडरवर जाणार त्यामुळे सप्लायचा इश्यू येणार नाही. नक्षत्र आयलँड येथे नवीन सबस्टेशन मंजूर केलेले आहे. त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सेक्टर दहा पासून म्हणजे शिवरोड, लक्ष्मीचौक आणि भारतमाता चौक क्रॉस करून नक्षत्र आयलँड सबस्टेशनपर्यंत केबल टाकायचे काम पावसामुळे रखडले आहे. पीसीएमसी ची परवाणगी केबल टाकण्याची मिळाली होती. पावसामुळे हे काम थांबले आहे. हे काम पूर्ण झाल्यास वीज समस्या येणार नाही.
>
> -पुष्पेंद्र सिंह सहाय्यक अभियंता महावितरण

**मोशी | प्रतिनिधी**

मागील दोन आठवड्यांपासून वीजेचा लपंडाव सुरू असून मोशी उपनगरातील बनकर वस्ती,बोराटे वस्ती, पुणे-नाशिक महामार्गावरील दोन्ही बाजूच्या सोसायटीतील नागरीक वीज समस्येने त्रस्त झाले आहेत. दिवसातून दोन ते तीन तास वीज गायब होत असल्याने या भागातील अनेक लघू उद्योजकांना देखील नुकसान सहन करावे लागत आहे. अनेक आय टी अभियंत्यांचे अजूनही वर्क फ्रॉम होम सुरू असून या वीजेच्या समस्येचा त्यांच्या कामावर मोठा परिणाम होत आहे. मोशीतील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून त्यामुळे वीजेच्या मागणीत वाढ झाली आहे. मात्र मागणीनुसार वीज पुरवठा होत नसल्याने यंत्रणेवर ताण येऊन वारंवार बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित होत आहे. मोशीतील वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन वीज पुरवठा सक्षम करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# 'म्हाडा'च्या अर्जदारांचा जीव टांगणीला

## विविध प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी झगडावे लागत आहे.

म्हाडा MHADA

**पुणे | प्रतिनिधी**

'म्हाडा'चे घर मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्यांना आता विविध प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी झगडावे लागत आहे. प्रामुख्याने अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला अशा कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागत आहे. यासाठी गरजूंनी सेतू आणि अप्पर तहसील कार्यालयाकडे महिनाभरापूर्वी अर्ज केले. पण, कागदपत्रे अजूनही मिळत नसल्याने त्यांचा जीव टांगणीला लागला आहे. 'म्हाडा'च्या घरांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून, नागरिक मोठ्या प्रमाणात कागदपत्रे काढण्यासाठी सेतू कार्यालयाकडे गर्दी करत आहेत. अनेकांना 'म्हाडा'चा अर्ज भरण्यासाठी जात व उत्पन्न प्रमाणपत्र, निवासी दाखले, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, पॅन कार्ड, रेशन कार्ड, लग्नानंतर पत्नीचे नाव बदललेले आधार कार्ड, आणि ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र अशी कागदपत्रे आवश्यक आहेत. नागरिकांना घरासाठी अर्ज करण्यापूर्वी सर्व पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावी लागत आहेत. 'म्हाडा'ने अर्जाची मुदत २० नोव्हेंबरपर्यंत वाढवली आहे. पण, अनेक अर्जदारांना अधिवास प्रमाणपत्र मिळवण्यासाठी, अप्पर तहसीलदार कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र आणि 'आपले सरकार'या संकेतस्थळावरून अर्ज केले आहेत.

# पुणे जिल्ह्यातील बिबट्याचा प्रश्न मंत्रालयात पोहोचला...

## मागच्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये बिबट्याची प्रचंड दहशत पसरली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मागच्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये बिबट्याची प्रचंड दहशत पसरली आहे. काही दिवसांच्या काळातच बिबट्याने 3 जणांचा (LEOPARDS) जीव घेतला, नुकतंच शिरूर मधील पिंपरखेड गावात अवघ्या 13 वर्षांच्या रोहन बोंबे या मुलाचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थ प्रचंड संतापले. 15 दिवसांच्या काळातच आजूबाजूच्या परिसरातील तीन जणांचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी वनविभागाचे वाहन पेटवून दिले, तसेच यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पुणे-नाशिक महामार्गावर रास्तारोको करण्यात आला होता.

आता रास्तारोको आंदोलन थांबवण्यात आलं असलं तरी शेवटच्या बिबट्याचा बंदोबस्त लागेपर्यंत यापुढं ही वेगवेगळ्या मार्गांद्वारे आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्धार करण्यात आलाय. या संदर्भात वनमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली बैठकही आयोजित करण्यात आली होती. आता एक बिबट्या जेरबंद करण्यात आलाय, पण तोच नरभक्षक बिबट्या असल्याची खात्री नसल्यानं इतर बिबट्याचं काय? हा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केलाय. तर आजवर पालकमंत्री अजित पवार आणि वनमंत्री गणेश नाईक यांनी घटनास्थळी धाव न घेतल्यान मंत्रालयातील बैठकीवर ग्रामस्थांनी बहिष्कार घातलाय. आता आंदोलनाची पुढची दिशा काय असेल. सरकारला बिबट्या जगवायचा आहे की माणूस जगवायचा आहे? असा खडा सवाल पुण्यातील संतप्त ग्रामस्थांनी उपस्थित केलाय.

जुन्नर तालुक्यातील काही बिबट काही वनताराला स्थलांतर करता येईल का ? कसा प्रस्ताव आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली आहे. ही राज्य आपत्ती घोषीत झाली पाहिजे. एक वनक्षेत्रात एक हजार बिबट आहेत. त्यासाठी कर्मचारी व यंत्रणा हवी आहे. मी मुख्यमंत्री यांना याबाबत विनंती केली आहे. यासंदर्भात ठोस कृती आराखडा तयार केला पाहिजे. केरळने हत्ती आणि मानव संघर्षासाठी राज्य आपत्ती जाहीर केली आहे.





### बाराशे बिबट्यांपैकी किती बिबटे वनताराला पाठविणार ?

**» दुसरीकडे पुण्यातील सर्व बिबटे गुजरातच्या वनतारासह विविध राज्यात वन क्षेत्रात पाठवायचे, तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्याचा निर्णय वनमंत्री गणेश नाईक यांच्या बैठकीत झालाय. पण शेतकऱ्यांना या निर्णयावर विश्वास नाही, बाराशे बिबट्यांपैकी किती बिबटे पाठवणार? फक्त शंभर? उर्वरित बिबट्यांचे काय? इथले बिबटे वनतारामध्ये पाठवले, याचा पुरावा कोण देणार? त्यामुळं आम्हाला या आश्वासनावर विश्वास नाही. अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतलीये**

### ग्रामस्थांचा तीव्र संताप

**» बिबट्याचा बंदोबस्त लागेपर्यंत यापुढं ही वेगवेगळ्या मार्गांद्वारे आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्धार करण्यात आलाय. या संदर्भात वनमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली बैठकही आयोजित करण्यात आली होती. आता एक बिबट्या जेरबंद करण्यात आलाय, पण तोच नरभक्षक बिबट्या असल्याची खात्री नसल्यानं इतर बिबट्याचं काय? हा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केलाय. तर आजवर पालकमंत्री अजित पवार आणि वनमंत्री गणेश नाईक यांनी घटनास्थळी धाव न घेतल्यान मंत्रालयातील बैठकीवर ग्रामस्थांनी बहिष्कार घातलाय.**

### बिबट्याचा प्रश्न राज्य आपत्ती जाहीर करा

**» पिंपरखेड येथील घटना दुर्दैवी आहे. जुन्नर तालुक्यातील बालकाचा असाच मृत्यू झाला आहे. बिबट मानव संघर्ष कमी करण्यासाठी प्रजननावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. मादी नसबंदीचा प्रस्ताव केंद्राला सादर झाला आहे. त्यासाठी पाठपुरावा होत असल्याचे शिरुरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी म्हटलंय. एका वनक्षेत्रातील 115 बिबट मादीचे प्रजनन नियंत्रण करायचे आहे. जुन्नर तालुक्यातील काही बिबट काही वनताराला स्थलांतर करता येईल का ? कसा प्रस्ताव आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली आहे. ही राज्य आपत्ती घोषीत झाली पाहिजे. एक वनक्षेत्रात एक हजार बिबट आहेत**

# बारामती राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सोमेश्वरकडून गुणवडीकडे; अजित पवारांचे धक्कातंत्र

## बारामती पंचायत समितीचे माजी सभापती संदीप बांदल यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनेत मोठा फेरबदल करण्यात आला असून बारामती पंचायत समितीचे माजी सभापती संदीप बांदल यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी अचानक घेतलेल्या या निर्णयाने बारामतीच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. बारामतीचे तालुकाध्यक्ष सोमेश्वरकडून गुणवडीकडे सरकले असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी युवा चेहऱ्यांना धक्कातंत्र अवलंबिले असल्याचे स्पष्ट झाले.

मागील काही दिवसांपासून तालुका अध्यक्षपदाच्या बदलाबाबत चर्चा रंगल्या होत्या. अनेकांची नावे समोर येत असताना अखेर अजित पवार यांनी सर्व तर्क-वितर्कांना पूर्णविराम देत गुणवडी पंचायत समिती गणातील संदीप बांदल यांच्यावर विश्वास दाखवला आहे. बारामती येथील राष्ट्रवादी भवनात जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. त्यानंतर गुणवडी गणातील राष्ट्रवादीच्या समर्थक कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदाची कमान यापूर्वी संभाजी होळकर यांनी सांभाळली होती. त्यांनी तालुक्यातील तळागाळातील सर्व घटकांना न्याय देत संघटन बांधणी केली होती. होळकर यांनी तालुकाध्यक्षपदाला साजेसे काम केले होते. होळकर यांनी सर्वांना सोबत घेऊन कार्यरत राहून अनेक निवडणुका एकहाती जिंकत बारामतीत राष्ट्रवादी पक्षाचे प्रबळ वर्चस्व टिकवून ठेवले होते. राष्ट्रवादीत फूट पडूनही अजित पवारांच्या नेतृत्वाखालील गटाने बारामतीतील बहुतांश संस्था आणि सत्तास्थाने ताब्यात ठेवत पक्षाला स्थिर ठेवले आहे.



### तरूणांची फळी उभारणीची काम सुरू

**» तथापि, गेल्या महिनाभरापासून बारामती तालुका राष्ट्रवादी अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती होणार, याबाबत चर्चेला उधाण आले होते. अनेक दिग्गजांची नावे चर्चेत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा आपले "धक्का तंत्र" वापरत, अनपेक्षित पणे गुणवडी गणातील कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन केलेले संदीप बांदल यांची निवड केली. राजकीय वर्तुळात या निर्णयाला "अजित पवारांचे धक्का तंत्र" असे संबोधले जात आहे. गेल्या पाच वर्षांपासून अजित पवार यांनी सहकारी संस्थांच्या निवडणुका, साखर कारखान्यांच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या माध्यमातून यंग ब्रिगेडला संधी देत समतोल साधला आहे. ज्येष्ठ आणि तरूणांचा समतोल साधल्याने संघटन मजबूतीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.**